UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/2013/
08 AUG 2012
18156

BY POST

# गांधी विचार परिषद, वर्धा

(स्व. श्री जमनालाल बजाज स्मृत्यर्थ)

दिनांक : 27 JUL 2013

II-12| |2013-14

प्रिय मित्र,

गेल्या काही वर्षापासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी भारताच्या निरनिराळ्या भागात "गांधी विचारांचा व त्यांच्या कार्याचा" परिचय करुन देण्याच्या हेतुने अल्पकालीन अभ्यास सत्रांचे आयोजन गांधी विचार परिषदे तर्फे सातत्याने केला जात आहे.

अल्पकालीन व दीर्घकालीन अभ्यासक्रमांचे आयोजन करणे, गांधी विचारांचे अध्ययन करु इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व सल्ला देणारी सुविधा केन्द्र उपलब्ध करुन देणे व त्या संबंधी निर्मिती करणे हा गांधी विचार परिषदेचा हेतू आहे.

महाराष्ट्रातील विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी या वर्षी २३ सप्टेंबर (सोमवार) ते २८ सप्टेंबर (शनिवार) २०१३ या कालावधीत सहा दिवसांचे अल्पकालीन शिबिर आयोजित करण्याचा मानस आहे. या शिबिराद्वारे शिबिरार्थ्यांना गांधी तत्वज्ञानाचे दर्शन व सखोल अध्ययन करण्याची संधी प्राप्त करुन दिली जाईल.

या शिबिरांतील चर्चा व अध्ययनाचे माध्यम मराठी व हिन्दी असेल. या पत्रासोबत शिबिराची माहिती देणारे सूचना पत्र जोडले आहे.

हे पत्रक आपल्या विद्यापीठाच्या/महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची मी या पत्राद्वारे आपणास विनंती करीत आहे. आपल्या विद्यापीठातून/महाविद्यालयातून फक्त दोन योग्य युवांची (युवक/युवती) निवड करुन आमच्याकडे सोबतच्या पत्रकातील आवेदन पत्र त्यांच्या पत्त्यांसह पाठविल्यास आम्हाला त्यांचेशी सरळ संपर्क साधता येईल. शिबिरातील चर्चा परिणामकारक व्हावी व प्रत्येकाला शिबिरात सहभागी होता यावे या हेतुने विद्यार्थ्यांची संख्या मर्यादा ४० ठेवली आहे.

शिबिरार्थ्यांच्या प्रवास भाड्याचा व्यय सोसण्याचे संस्थेचे आर्थिक सामर्थ्य नसल्याने आपल्या विद्यापिठाने/महाविद्यालयाने शिबिरार्थ्यांचा प्रवास खर्च सोसावा अशी मी आपणास विनंती करतो. शिबिर काळातील वास्तव्य व भोजनादिंची सोय संस्थेतर्फे केली जाईल.

शिबिराचे आयोजन सुलभ करण्याच्या हेतूने ज्या विद्यार्थ्यांना आपल्याला शिबिराला पाठवावयाचे आहे त्यांची नावे व संपूर्ण पत्ते ३० ऑगस्ट, २०१३ पर्यंत आमचेकडे आल्यास आम्हाला त्यांचेशी संपर्क साधणे सोईचे होईल. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत.

धन्यवाद.

आपला विनित,

(भरत महोदय)
संचालक

| Registrar's Secretariat | |
|---|---|
| Inward No. | |
| Date | 8/8/13 |
| Alloted to Section/Unit | DSW |
| Registrar | |
| Dy. Registrar | |
| Asstt. Registrar | |

सहपत्रः पत्रकाच्या दोन प्रती

प्रति,
The Registrar
University of Bombay
MUMBAI

AR
Website for wide publicity
also sent to colleges having Gandhian studies dept.


GOPURI, WARDHA – 442 001 (Maharashtra) India
Tel. + 91 (0) 7152-243585, 240315 Telefax: + 91 (0) 7152-240315
E-mail:- mahatma_wda@sancharnet.in / igsgvp@yahoo.com
Website: www.gvpwardha.in